# नवजात अर्भकांसाठी 'केईएम'मध्ये कक्ष

**पुणे, ता. ११ :** नवजात अर्भकांसाठी केईएम रुग्णालयात अतिदक्षता कक्ष सुरू करण्यात आला आहे.

आशा जैठा यांच्या हस्ते नुकतेच त्याचे उद्‌घाटन झाले. फाउंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, फिनोलेक्सचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, विश्वस्त रितू छाब्रिया, डॉ. के. जे. कोयाजी, बालरोगतज्ज्ञ डॉ. ए. एन. पंडित आदी या वेळी उपस्थित होते. या कक्षाला सोनाली दि लिटल स्टार्स रूम असे नाव देण्यात आले आहे. त्यामध्ये सहा बिछाने, एक व्हेंटीलेटर, बबल सीपीएपी इत्यादी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.